## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 22/02/2020 (शनिवार)
## (दुपार)

---

### विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 21/02/2020 चे 13:30 वा. ते 15.00 वा. चे सुमारास 15 वर्षीय पीडित/फिर्यादी हि मैत्रिण व भाऊ सह मोटरसायकलने महादेवाचे दर्शन घेण्याकरीता शिरजोरी बाबा येथे गेली होती. पीडिता हि दर्शन घेवुन खाली उतरत असतांना 15 वर्षीय विधी सर्घषग्रस्त बालक याने पीडितेला पाठी मागुन येवुन धक्का मारला तेव्हा पीडित मुलीच्या भावाने त्याला हटकले असता विधी सर्घषग्रस्त बालकाने हातबुक्कीने मारहाण केली. तसेच पीडित मुलगी ही सोबत असलेल्या मैत्रिणीच्या घरी गेली असता विधी सर्घष ग्रस्त बालक याने अनाधिकृतपणे घरात प्रवेश केला. यानंतर विधी सर्घषग्रस्त बालकाने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपी क्र 1) राजेश चितोडीया, वय 25 वर्ष, 2) राजेश हरीणखेडे, वय 24 वर्ष व 3) विकास राउत, वय 21 वर्ष हे पिडीत मुलीला शाळेतुन जाता येता अश्लिल शेरेबाजी करीत होते तसेच पिडीतेचा पाठलाग करीत होते.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), 354(ड), 452, 323, 34 भादंवि. सहकलम 12 बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक चवरे 9867672244 हे करीत आहे.

### अपघातात जखमी

पो.स्टे. बोरी :–अंतर्गत 14 कि.मी. मौजा वर्धा ते नागपूर रोड शिवार हळदगाव शिवार टोलनाक्या जवळ येथे दिनांक 21/02/2020 चे 15:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रशिक अनिल पाटील, वय 15 वर्ष, रा. सेलडोह ता. सेलु जि. वर्धा हा त्याचा मित्र नामे– तुषार सुरेश इरपाते, वय 16 वर्ष व साहील कैलास मडावी, वय 13 वर्ष, दोन्ही रा. सेलडोह सह पायदळ गाडवमुखी मंदीरयात्रा करीता वर्धा ते नागपुर रस्त्याने जात होते. दरम्यान मागुन वर्धा ते नागपुरच्या दिशेने येणाऱ्या एनएल–01/एबी–0278 क्रमांकाचा कंटेनर गाडीचा चालक आरोपी नामे– मच्छिद्र सोनाजी उर्फ सोमाजी जाधव, वय 48 वर्ष, रा. बोइसर (भिवंगी), ता. वैजापुर जि. औरंगाबाद याने त्याच्या ताब्यातील कंटेनर गाडी भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा मित्र तुषार इरपाते व साहील मडावी यांना मागुन धडक दिली. या अपघातात तुषार इरपाते व साहील मडावी दोघेही जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक शेख 8408806690 हे करीत आहे.

## निष्काळजीपणे मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 21/02/2020 चे 08:00 वा. दरम्यान आदासा शिवारातील नाल्यामध्ये बंधारा बाधंण्याचे काम खड्डा खोदुन चालु असंताना खड्डयाचा बाजुच्या मातीचा ढिगारा खड्डयामध्ये कोसळुन मजुरांच्या अंगावर पडला. त्यामध्ये कामावर असलेल्या चार मजुर महिला नामे– 1) वर्षा शामलाल मडावी, वय 26 वर्ष, रा. टाकला, ता. बरघाट, जि. सिवनी (म.प्र), 2) सुनिताबाई कैलाश, वय 35 वर्ष, 3) रामप्यारी उदलसिंग ककोरिया, वय 18 वर्ष व 4) अनुसयाबाई टेकाम, वय 45 वर्ष, सर्व रा. जि. सिवनी (म.प्र) यांचा दबुन मृत्यू झाला. तर 1) इंद्रा दुर्वे, 2) मधुबाला व 3) प्रियंका सर्व रा. जि. सिवनी (म.प्र) हे तीन्ही मजुर जखमी झाले. सदरची घटना ही आरोपी नामे– 1) मनदीप नरेन्द्र चौधरी (ठेकेदार), वय 25 रा. गजानन नगर, मानेवाडी रिंग रोड नागपुर व 2) जगदीश देवाराम प्रसाद (साईट सुपरवायजर), वय 45 रा. जयतारण राजस्थान ह.मु. आदासा शिवार यांच्या निष्काळजीपणेमुळे घडली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. सियाबती पुनाराम उईके, वय 38 वर्ष, रा. गोरखपुर त. बरघाट जि. सिवनी ह.मु. आदासा शिवार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी विरुध्द कलम 304 (अ), 337, 34 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री सागर कारंडे 7722011228 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर